**मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता योजना**
**(राज्यस्तरीय योजना)**
**१) मुरघास संयंत्र वाटप योजनेत समूह गटाचा समावेश करणे.**
**२) वराह पालन योजनेचा समावेश करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग,**
**पुरक शासन निर्णय क्रमांक- डीएएचडी-१४०१७/०१/२०२६-एएच-४ (E-१५४५०९१)**
**मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,**
**मंत्रालय, मुंबई -४०००३२**
**दिनांक :- १३ एप्रिल , २०२६**

वाचा :- १)कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभागाचा शासन निर्णय क्र. डीएएचडी-१४०१७/०१/२०२६-एएच-४ (E-१५४५०९१), दि.०९.०३.२०२६
२)आयुक्त पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालयीन पत्र क्र.डीडीडी/३१/भाग-२/२६६५/२०२१/पसं-१२, दि.०२.०६.२०२५.

**प्रस्तावना :-**

वाचा क्र. १ येथील शासन निर्णयान्वये राज्यात "मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता योजना (राज्यस्तरीय योजना)" लागू करण्यात आली आहे. सदर शासन निर्णयातील "(४) वैरण विकास योजना" अंतर्गत "मुरघास संयंत्र वाटप योजनेव्दारे उद्योजकता विकास करणे" या योजनेमध्ये योजनेच्या यशस्वितेसाठी वैयक्तिक लाभार्थ्यांबरोबरच शेतकरी उत्पादक संस्था / समुहगट यांचा समावेश करण्याची शिफारस आयुक्त पशुसंवर्धन, पुणे यांनी त्यांच्या वाचा क्र.२ येथील पत्रान्वये केली आहे.

२. विधान मंडळाच्या २०२६ च्या अर्थसंकल्पिय अधिवेशनात उपस्थित करण्यात आलेल्या लक्षवेधी सूचनेन्वये वराह पालनास प्रोत्साहन देण्याचा मुद्दा उपस्थित करण्यात आला होता.

३. वरील पार्श्वभूमीवर वाचा क्र. १ अन्वये लागू करण्यात आलेल्या "मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता योजना (राज्यस्तरीय योजना)" मधील "मुरघास संयंत्र वाटप योजनेव्दारे उद्योजकता विकास करणे" या योजनेमध्ये वैयक्तिक लाभार्थ्यांबरोबरच शेतकरी उत्पादक संस्था / समुहगटाचा समावेश करणे तसेच वराह पालनास प्रोत्साहन देण्यासाठीच्या उपयोजनेचा समावेश "मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता योजना (राज्यस्तरीय योजना)" मध्ये करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यास अनुसरुन पुढीलप्रमाणे पुरक शासन निर्णय निर्गमित करण्यात येत आहे.

**शासन निर्णय :-**

४. वाचा क्र.१ येथील दि. ०९.०३.२०२६ च्या शासन निर्णयातील परिच्छेद क्र.७ मधील "(४) वैरण विकास योजना" अंतर्गत "मुरघास संयंत्र वाटप योजनेव्दारे उद्योजकता विकास करणे" या योजनेमध्ये खालील शेतकरी समुहगटाचा समावेश करण्यात येत आहे.

अ) सहकार अधिनियम / धर्मादाय आयुक्त अंतर्गत नोंदणीकृत शेतकरी उत्पादक संस्था (FPO) / सहकारी संस्था

आ) कंपनी कायदा, २०१३ अंतर्गत शेतकरी उत्पादक कंपनी (FPC)

इ) आत्मा अंतर्गत (तालुका कृषी अधिकारी यांचे नोंदणी प्रमाणपत्र असलेला नोंदणीकृत संस्था शेतकरी समुह गट (Farmers Group)

ई) महिला आर्थिक विकास महामंडळाकडे नोंदणीकृत असलेला समुदाय आधारीत संसाधन केंद्र (Community Managed Resource Centre)

उ) उमेद अंतर्गत नोंदणीकृत प्रभाग संघ

**पात्रता:-**

१) संस्थेचे किमान ५० शेतकरी सदस्य असावेत.

२) संस्थेचे भागभांडवल /खेळते भागभांडवल किमान रु. ५ लक्ष असावे.

३) संस्थेचे लगतच्या मागील ३ वर्षाचे लेखापरीक्षण झालेले असावे

४) लेखापरीक्षण अहवालानुसार संस्था नफ्यात असावी.

**अटी:-**

अ) सदर योजनेंतर्गत प्राप्त होणारे लाभधारकांचे अर्ज विचारात घेऊन वरील समुह गटांना प्राधान्य देण्यात येईल.

आ) वैरण विकास योजना" अंतर्गत "मुरघास संयंत्र वाटप योजनेव्दारे उद्योजकता विकास करणे" या योजनेमध्ये नमूद इतर अटी जसाच्या तशा लागू राहतील.

५. **वराह पालन गट वाटप योजना**

वाचा क्र. १ येथील दि. ०९.०३.२०२६ च्या शासन निर्णयातील परिच्छेद क्र. ७ मधील (३) "कुक्कुट पक्षांचे वाटप" या घटकातील उपयोजना (इ) नंतर पुढील मजकूराचा समावेश करण्यात येत आहे.

"३) (अ) वराह पालन गट वाटप योजना प्रकल्पाद्वारे उद्योजकता विकास उपयोजनेचा समावेश करण्यात येत असून त्याचा तपशील खालीलप्रमाणे -

| बाब | तपशील |
|---|---|
| लाभाचे स्वरुप | ५+१ वराह गट + विमा |
| लाभार्थी | सर्व प्रवर्गातील दारिद्रय रेषेखालील, भुमीहीन, अत्यल्प भुधारक, अल्प भुधारक, सुशिक्षीत बेरोजगार, महिला बचत गट |
| लाभार्थी निकष | सर्वसाधारण प्रवर्ग, अनुसुचित जाती, अनुसुचित जमाती मधील लाभार्थी खालील घटकांमधून उतरत्या प्राधान्य क्रमाने करण्यात येईल.<br>अ) भुमीहीन<br>ब) अत्यल्प भूधारक (१ हेक्टरपर्यंत भूधारक)<br>क) अल्प भूधारक (१ ते २ हेक्टरपर्यंत भूधारक)<br>ड) वनहक्क धारक<br>इ) महिला बचत गटातील लाभार्थी (अ.क्र. अ ते ड मधील)<br>वरील घटकांमध्ये दिव्यांगांसाठी ५ टक्के तसेच महिलांना ५० टक्के आरक्षण लागू राहील. |

| | |
|---|---|
| पात्रता | पशुपालन व्यवसायाचे शासकीय /निमशासकीय संस्थेचे प्रशिक्षण ( अर्ज करतांना प्रशिक्षण प्रमाणपत्र नसल्यास अनुदानाचा लाभ घेण्यापुर्वी प्रशिक्षण घेणे आवश्यक राहील) |
| गटाची किंमत | **५+१ वराह गट वाटप**<br>१. १) पशुधन खरेदी- १) प्रति मादी वराह- रु. २२,५००/-<br>२) नर वराह - रु. २५,०००/-<br>२) विमा - १२.७५ टक्के (३ वर्षासाठी)- रु. १७,५३१/-<br>३) विक्री कर - १८ टक्के रु. ३१५६/-<br>एकूण - रु. १,५८,१८७/-<br>२. शेड, खाद्य, पाणी उपकरणे व साहित्य (शेड वॉशर/ स्प्रे पंप) रु. ५०,००० /-<br>३. **एकूण प्रकल्प किंमत रु. २,०८,१८७/-** |
| अनुदानाचे स्वरुप | १. सर्वसाधारण लाभार्थी - ५० टक्के<br>२.अनुसुचित जाती जमाती प्रवर्गातील लाभार्थी - ७५ टक्के |
| आवश्यक कागदपत्रे | १. पशुपालन व्यवसायाचे शासकीय /निमशासकीय संस्थेचे प्रशिक्षण प्रमाणपत्र (अर्ज करतांना प्रशिक्षण प्रमाणपत्र नसल्यास अनुदानाचा लाभ घेण्यापुर्वी प्रशिक्षण घेण्याबाबतचे हमी पत्र.)<br>**किंवा**<br>स्थानिक पशुवैद्यकीय अधिकाऱ्याचे २ वर्षाचे अनुभव प्रमाणपत्र<br>२. दिव्यांगांसाठी UDID प्रमाणपत्र<br>३. शेडसाठी जागा उपलब्ध असल्याचे तसेच वराह मोकाट सोडले जाणार नाही याबाबतचे स्वयंघोषणा पत्र. |
| अटी व शर्ती | १. या प्रकल्पांतर्गत खरेदी करावयाचे वराह हे सुधारित आणि विदेशी जाती (उदा. यॉर्कशायर/हॅम्पशायर/लँड्रेस इत्यादी तसेच स्थानिक हवामानाशी जुळवून घेणाऱ्या आणि उच्च उत्पादकता असलेल्या वय १ ते २ वर्ष वयोगटातील असावे.<br>२. वराह गटाची खरेदी ही खरेदी समितीच्या उपस्थितीत करण्यात यावी.<br>३. वराह गटाची खरेदी राष्ट्रीय पशुधन प्रक्षेत्रावर उत्पादित झालेल्या वराहातून प्राधान्याने करण्यात यावी.<br>४. सदर प्रक्षेत्रावर वराह उपलब्ध नसल्यास शासकीय फार्म/ खाजगी ब्रिडींग फार्म्सवरुन किंवा खुल्या बाजारातून लाभार्थ्यांच्या पसंतीनुसार वजनानुसार करण्यात यावी.<br>५. पात्र लाभार्थ्याने त्याची निवड झाल्यानंतर जिल्हा उपायुक्त (पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय) यांनी कळविलेल्या दिनांकापर्यंत म्हणजेच एक महिन्याच्या कालावधीत गठीत समिती समवेत खरेदी करावी.<br>६. लाभार्थ्यांने उपरोक्त प्रमाणे विहीत केलेल्या कालमर्यादेत जनावरांची खरेदी न केल्यास अशा लाभार्थ्याचे नाव मूळ प्रतिक्षा यादीतील शेवटच्या |

| | |
|---|---|
| | क्रमांकावर ठेवण्यात येवून, पुढील प्रतिक्षाधिन लाभार्थ्यास लाभ देण्यात येईल.<br>७. खरेदी केलेल्या पशुधनाची किंमत योजनेमध्ये निर्धारित केलेल्या किंमतीपेक्षा जास्त असल्यास फरकाची रक्कम संबंधित लाभार्थ्यांनी अदा करावयाची आहे. तसेच, पशुधनाच्या खरेदीनंतर जनावरे वाहतूकीचा संपूर्ण खर्च संबंधित लाभार्थ्याने करावयाचा आहे.<br>८. वाटप करण्यात येणाऱ्या पशुधनाचा लाभार्थी व संबंधित जिल्हयाचे जिल्हा पशूसंवर्धन उपायुक्त यांच्या संयुक्त नावाने ३ वर्षांसाठी विमा उतरविण्यात यावा.<br>९. योजनेमध्ये वाटप केलेले पशुधन मृत पावल्यास अंमलबजावणी अधिकारी यांच्या संमतीने विम्याच्या रकमेतून लाभार्थीस दूसरे पशुधन खरेदी करुन पूरविण्यात यावे.<br>१०. तालुका पशुसंवर्धन व दुग्ध व्यवसाय अधिकारी यांनी लाभार्थ्याचा खरेदी अहवाल (खरेदी पावती, छायाचित्र, लाभार्थ्यांचे बँकचे तपशील, विमा) जिल्हा उपायुक्त (पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय) यांना सादर करावा.<br>११. योजनेंतर्गत वाटप केलेल्या पशुधनाची भारत पशुधन पोर्टलवर नोंदणी लाभार्थी ज्या पशुवैदयकीय संस्थेच्या कार्यक्षेत्रातील आहे त्या संस्थेच्या संस्थाप्रमुखानी करणे बंधनकारक राहील.<br>१२. या संपुर्ण खरेदी प्रक्रियेचा समावेश लाभार्थ्याकडुन करुन घ्यावयाच्या बंधपत्रामध्ये करण्यात यावा. |

६. **ब) वराह पालन व्यवसायाव्दारे उद्योजकता विकास करण्यासाठी घेतलेल्या कर्जावर व्याज सवलत देणे:-**

१. वाचा क्र.१ येथील दि. ०९.०३.२०२६ च्या शासन निर्णयातील परिच्छेद क्र.७ मधील “(५) उद्योजकता विकास योजना” या योजनेंतर्गत देय असलेली “४ टक्के व्याज सवलत योजना” शेळी/ मेंढी / गाय/म्हैस/ कुक्कुटपालन या पशुपालन व्यवसायाबरोबरच “वराह पालन” व्यवसायासही लागू करण्यात येत आहे.

७. योजनांच्या अंमलबजावणीसाठी वाचा क्र. १ येथील शासन निर्णयान्वये विहित केलेल्या इतर अटी/ तरतूदी जसाच्या तशा लागू राहतील.

८. सदरचा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून, त्याचा संगणक सांकेताक २०२६०४१३११०४०८१४०१ आहे. सदर शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून निर्गमित करण्यात येत आहे.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशाने व नावाने,**

MARALE NIWRUTTI BHAGUJI

Digitally signed by MARALE NIWRUTTI BHAGUJI
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Agriculture and Adf Dept,
2.5.4.20=8A75C414FF50CE35220C63CD53D2EB1A99A474C02300BEEA74BB051C4C3C90A9,
postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=5C891DA87D2A4842558454524CC114BA5B2F67A2A80796592830D345500F15CC, cn=MARALE NIWRUTTI BHAGUJI
Date: 2026.04.13 11:05:12 +05'30'

**(नि.भा.मराळे)**

**सह सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा. मंत्री (पशुसंवर्धन) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.

२. आयुक्त पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य, औंध, पुणे.
३. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
४. मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र पशुधन विकास मंडळ, जुने वळू संगोपन केंद्र, बडा हनूमान मंदिराजवळ, सिव्हिल लाईन्स, तेलंगखेडी, नागपूर.
५. व्यवस्थापकीय संचालक, पुण्यश्लोक अहिल्यादेवी महाराष्ट्र मेंढी व शेळी विकास महामंडळ, पुणे.
६. पशुसंवर्धन सहआयुक्त, भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी राज्यस्तरीय रोग अन्वेषण विभाग, पुणे.
७. पशुसंवर्धन सहआयुक्त, पशुजैव पदार्थ निर्मिती संस्था, औंध, पुणे.
८. सर्व प्रादेशिक सहआयुक्त पशुसंवर्धन.
९. पशुसंवर्धन उपायुक्त, गुण नियंत्रण प्रयोगशाळा, गोरेगाव, मुंबई.
१०.विभागीय व्यवस्थापक, गोठीत रेत प्रयोगशाळा, पुणे, नागपूर व औरंगाबाद (हर्सुल).
११.सर्व जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त
१३.सर्व सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन, विभागीय रोग अन्वेषण प्रयोगशाळा.
१४.सर्व सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन, जिल्हा पशुवैद्यकीय सर्वचिकित्सालय.
१५.सर्व सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन, तालुका पशुवैद्यकीय चिकित्सालय.
१६.सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन, पशुवधगृह, गोवंडी, देवनार.
१७.अवर सचिव (पदुम -३), कक्ष अधिकारी (पदुम १, २ व १६) कृषी व पदुम विभाग, मंत्रालय,
१८. निवड नस्ती (पदुम-४).